असा. क्र. ५०

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**गुरुवार, ऑगस्ट २५, २००५/भाद्र ३, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२.**—महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद अधिनियम, २००२ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम. . . . . . — **पृष्ठे ४७६-४७९**

दिनांक २४ ऑगस्ट २००५ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २५ ऑगस्ट २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद अधिनियम, २००२ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

२००४ चा महा. २. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद अधिनियम, २००२ यात सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद (सुधारणा) अधिनियम, २००५ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रात** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद अधिनियम, २००२ (यात यानंतर ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मध्ये,— २००४ चा महा. २.

(क) खंड (ख) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(ख-१) "सूचिदाखल व्यवसायी" याचा अर्थ, कलम ३०क च्या पोट-कलम (२) अन्वये परिषदेने प्रसिद्ध केलेल्या व ठेवलेल्या सूचीमध्ये नाव दाखल केलेला पारंपरिक व्यवसायी, असा आहे ;" ;

(ख) खंड (घ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(घ-१) "सूची" याचा अर्थ, कलम ३०क च्या पोट-कलम (२) अन्वये सूचिदाखल व्यवसायींची, परिषदेने प्रसिद्ध केलेली आणि ठेवलेली सूची, असा आहे ;" ;

(ग) खंड (छ) मध्ये, "संगणक यंत्रणा किंवा तत्सम" हा मजकूर वगळण्यात येईल.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (३) मध्ये,—

(क) खंड (ग) मध्ये, पहिल्या परंतुकानंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, खंड (ख) आणि (ग) मध्ये उल्लेख केलेल्या सदस्यांना निवडून देण्यासाठीची पहिली निवडणूक, हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीत घेण्यात येईल :" ;

(ख) विद्यमान दुसऱ्या परंतुकामध्ये, "परंतु आणखी असे की" या मजकुराऐवजी, "परंतु तसेच" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २० ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम २० मध्ये व समासटीपेमध्ये, "भारतातील" हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी आला असेल त्या त्या ठिकाणी, त्याऐवजी "भारतातील किंवा विदेशातील" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २९ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम २९ मधील पोट-कलम (१) मध्ये, "तो आवश्यक असलेली व्यवसायोपचार आणि भौतिकोपचार विषयक अर्हता धारण करीत नाही या कारणाखेरीज" हा मजकूर वगळण्यात येईल आणि त्या पोट-कलमातील "नोंदवहीतून काढून टाकले असता," या मजकुरानंतर, "किंवा सूचित नाव दाखल करण्यासाठी कलम ३०क च्या पोट-कलम (२) खाली केलेला त्याचा अर्ज फेटाळण्यात आला म्हणून," हा मजकूर दाखल करण्यात येईल.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ३० नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ यामध्ये नवीन कलम ३०क समाविष्ट करणे.

" ३० क. (१) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद (सुधारणा) अधिनियम, २००५ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सुधारणा अधिनियम " असा करण्यात आला आहे) अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी, जी व्यक्ती दहा वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या काळापासून एकाच ठिकाणी, सातत्याने आणि विनाव्यत्यय, रुग्णाला तोंडावाटे किंवा अन्य कोणत्याही पद्धतीने कोणतेही औषध न देता, हाड बसविण्याचा आणि स्नायूंचे दुखणे बरे करण्यासाठी मालिशने उपचार करण्याचा आपला पारंपरिक धंदा किंवा व्यवसाय करीत असेल आणि पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे परिषदेच्या सूचीमध्ये जिने आपले नाव दाखल केले असेल अशा व्यक्तीस, त्याच ठिकाणी असा व्यवसाय चालू ठेवता येईल. (२००५ चा महा. ४२.) प्रस्थापित व्यवसायींना हाड बसविण्याचा आणि मालिशने उपचार करण्याचा त्यांचा पारंपरिक व्यवसाय चालू ठेवण्यास परवानगी देणे.

(२) (क) पोट-कलम (१) मध्ये घालून दिलेल्या अटी पूर्ण करणाऱ्या व आपला पारंपरिक धंदा किंवा व्यवसाय चालू ठेवण्यास इच्छुक असलेल्या पारंपरिक व्यवसायीस, उक्त सुधारणा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, विहित नमुन्यात, एक हजार रुपये फीसह, आणि पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, राज्यातील दिलेल्या पत्त्यावर सातत्याने धंदा किंवा व्यवसाय करीत असल्याचा, विहित केल्याप्रमाणे पुरावा देऊन परिषदेकडे अर्ज करता येईल :

परंतु, उपरोक्त कालावधी समाप्त झाल्यावर सूचित नाव दाखल करण्याकरिता केलेला कोणताही अर्ज विचारार्थ स्वीकारण्यात येणार नाही.

(ख) परिषदेस, खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत असा अर्ज प्राप्त झाल्यावर, अर्जाची आवश्यक ती पडताळणी करून आणि अर्जदारांच्या दाव्याच्या खरेपणाविषयी स्वतःची खात्री करून घेतल्यानंतर, या अधिनियमाखाली अशा व्यवसायींची सूची तयार करता येईल आणि अशा सूचिदाखल केलेल्या व्यवसायींची यादी **राजपत्रात** प्रसिद्ध करता येईल :

परंतु, परिषदेने ज्या पारंपरिक व्यवसायीचा सूचित नाव दाखल करण्यासाठी केलेला अर्ज फेटाळला असेल त्याला, कलम २९ खाली तरतूद केल्याप्रमाणे राज्य शासनाकडे अपील दाखल करता येईल :

परंतु आणखी असे की, अपिलामध्ये अपीलकाराचा दावा अपील प्राधिकरणाद्वारे मान्य करण्यात आला असेल तर, परिषद, अशा व्यवसायीचे नाव सूचीदाखल करील आणि अशी सूची सुधारित करून, सूचीमध्ये अपीलकाराच्या नावाचा समावेश करील आणि अशी सुधारणा **राजपत्रात** प्रसिद्ध करील. ”.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ८७ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, ऑगस्ट २५, २००५/भाद्र ३, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra State Council for Occupational Therapy and Physiotherapy (Amendment) Act, 2005 (Mah. Act No. XLII of 2005), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XLII OF 2005.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 25th August 2005)*

An act to amend the Maharashtra State Council for Occupational Therapy and Physiotherapy Act, 2002.

Mah. II of 2004. WHEREAS it is expedient to amend the Maharashtra State Council for Occupational Therapy and Physiotherapy Act, 2002, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Fifty-sixth Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement. **1.** (*1*) This Act may be called the Maharashtra State Council for Occupational Therapy and Physiotherapy (Amendment) Act, 2005.

(2) It shall come into force on such date as the State Governemnt may, by notification in the *Official Gazette,* appoint.

Amendment of section 2 of Mah. II of 2004. **2.** In section 2 of the Maharashtra State Council for Occupational Therapy and Physiotherapy Act, 2002 (hereinafter referred to as "the principal Act"),— Mah. II of 2004.

(*a*) after clause (*b*), the following clause shall be inserted, namely :—

"(*b-1*) "Enlisted practitioner" means a traditional practitioner enlisted by the Council in the List published and maintained under sub-section (*2*) of section 30A ; ";

(*b*) after clause (*d*), the following clause shall be inserted, namely :—

"(*d-1*) "List" means the List of the Enlisted practitioners published and maintained by the Council under sub-section (*2*) of section 30A ; ";

(*c*) in clause (*g*), the words "with computerised system and the like" shall be deleted.

Amendment of section 3 of Mah. II of 2004. **3.** In section 3 of the principal Act, in sub-section (*3*),—

(*a*) in clause (*c*), after the first proviso, the following proviso shall be inserted, namely :—

"Provided further that, the first election for the election of the members referred to in clauses (*b*) and (*c*) shall be held within a period of two years from the date of commencement of this Act : ";

(*b*) in the existing second proviso, for the words "Provided further that" the words "Provided also that" shall be substituted.

4. In section 20 of the principal Act, including the marginal note, for the words " in India ", wherever they occur, the words " in India or abroad " shall be substituted. Amendment of section 20 of Mah. II of 2004.

5. In section 29 of the principal Act, in sub-section (*1*), for the words " except that he is not possessed of the requisite occupational therapy and physiotherapy qualifications, " the words, brackets and figures " or his application for enlistment under sub-section (*2*) of section 30A has been rejected, " shall be substituted. Amendment of section 29 of Mah. II of 2004.

6. After section 30 of the principal Act, the following section shall be inserted, namely :— Insertion of new section 30A in Mah. II of 2004.

" **30A.** (*1*) Notwithstanding anything contained in this Act, a traditional practitioner who has continuously and uninterruptedly at one place only, for not less than ten years prior to the date of coming into force of the Maharashtra State Council for Occupational Therapy and Physiotherapy (Amendment) Act, 2005 (hereinafter referred to as " the said Amendment Act ") been in the traditional practice or profession of bone-setting or treatment by massage for cure of any muscular pain, without administering any drugs to the patient either orally or by any other method, and has got himself enlisted with the Council as provided in sub-section (*2*), may continue to practice such profession at the same place. Established practitioners to be allowed to continue to practice traditional profession of bone-setting and treatment by massage.

Mah. XLII of 2005.

(*2*) (*a*) A traditional practitioner satisfying the conditions laid down in sub-section (*1*) desirous of continuing his traditional practice or profession may, within six months from the date of coming into force of the said Amendment Act, apply to the Council in the prescribed form, alongwith a fee of rupees one thousand and proof as prescribed, of having been continuously in practice or profession as provided in sub-section (*1*), at a given address in the State :

Provided that, no application for enlistment of the name shall be entertained after the expiry of the aforesaid period.

(*b*) The Council may, on receiving such application within the time limit specified in clause (a), after necessary verification of the application and satisfying itself about the genuineness of the claim of the applicant, enlist such practitioner under this Act and publish in the List of such Enlisted practitioners in the *Official Gazette* :

Provided that, any traditional practitioner whose application for enlistment is rejected by the Council may file an appeal to the State Government as provided under section 29 :

Provided further that, if in appeal the claim of the appellant is upheld by the appellate authority, the Council shall enlist such practitioner and include the name of the appellant in the List, by amending such List and publish such amendment in the *Official Gazette.* ".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई